एस.सी.सी.४०३/२०१७
सरकार वि. सचीन कुदळ
निशाणी ५२

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ७ याची जबानी**
**मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – एकनाथ पंडीत निपसे, वय – ३९ वर्षे,
व्यवसाय – पोलीस हवालदार, राहणार – अहमदनगर,
तालुका – अहमदनगर, जिल्हा – अहमदनगर.

**सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत –**

१. दिनांक १०.०७.२०१७ रोजी मी पोलीस स्टेशन अकोले येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी माझेकडे गुन्हा रजिस्टर नंबर ९८/२०१७ भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४ चा तपास लेखी आदेशाने माझ्याकडे देण्यात आला. आता मला सदर आदेशाची प्रत दाखवण्यात आली. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५३** देण्यात येते.

२. माझ्याकडे तपास आल्यानंतर मी कागदपत्र ताब्यात घेतली. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ हे अकोले येथील बाजारतळासमोरील कोल्हार–घोटी रोडवर होते. आता मला अभिलेखावरील निशाणी ४८ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. तो तोच असून त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर फिर्यादीचा पुरवणी जबाब घेतला. फिर्यादीने फिर्याद देतवेळी घटना ११:३० वाजता घडली असे सांगितले होते परंतु, ती घटना रात्री १२:०० वाजता घडली असे पुरवणी जबाबामध्ये सांगितले होते. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब घेतले. त्यानंतर दुस–या दिवशी आरोपीच्या व जखमीच्या गाडींचा

पंचनामा केला. आरोपीची गाडी एम.एच १२ सी.ए. ३४५९ क्रमांकाची झेन गाडी होती. सदर गाडीचे समोरील बोनेट फुटलेले होते, काच फुटलेली होती, दोन्ही दरवाजे घासलेले होते. मोटारसायकलचा नोंदणी क्रमांक एम.एच १४ बी.आर. ०८०५ असा होता. सदर मोटारसायकलचे हॅन्डेल तुटलेले होते, समोरील खोपडी खरचटलेली होती व गाडीचे नुकसान झालेले होते. आता मला अभिलेखावरील निशाणी ३६ वरील सदर गाडींचा पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व पंचांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. गाडी ताब्यात घेवून पोलीस स्टेशनला जमा केली. त्याची मुद्देमाल पावती तयार करून कागदपत्रात समाविष्ट केली. आता मला अभिलेखावरील सदरची पावती दाखवण्यात आली. ती तिच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी ५४** देण्यात येते.

३. त्यानंतर चारचाकी झेन गाडीची तांत्रीक तपासणी वाहन निरीक्षक, एस.टी. महामंडळ यांचेकडून करून घेवून कागदपत्रात प्रमाणपत्र समाविष्ट केले. तसेच मोटारसायकलची चैताली ॲटोमोबाईल्स यांचेकडून तांत्रीक तपासणी करून त्याचे प्रमाणपत्र कागदपत्रात समाविष्ट केले. त्यानंतर आरोपीस मोटार वाहन कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली. आता मला अभिलेखावरील सदरची नोटीसची प्रत दाखवण्यात आली. ती तिच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५५** देण्यात येते.

४. सदर अपघात जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळण्याकरीता वैद्यकीय अधिकारी यांना पत्र दिले. आता मला अभिलेखावरील वैद्यकीय अधिकारी यांना दिलेल्या पत्राची प्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी सही

असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी ५६** देण्यात येते. वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करून कागदपत्रांत समाविष्ट केले. त्यानंतर झेन गाडीचे कागदपत्र मिळण्याकरीता उपप्रादेशीक परिवहन कार्यालय यांना पत्र दिले. सदर पत्राची स्थळप्रत आता मला दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी ५७** देण्यात येते. वाहनाची तांत्रीक तपासणी करण्याकरीता वाहन निरीक्षक, एस.टी.महामंडळ यांना दिलेल्या पत्राची स्थळप्रत दाखवण्यात आली. ती तिच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ५८** देण्यात येते.

५. तपासाअंती आरोपीने त्याच्या ताब्यातील गाडी ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवून जखमींना धडक देवून त्यांना औषधोपचार उपलब्ध करून न देता निघून गेला असे निष्पन्न झाल्याने त्याचे विरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीस ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती. एस. बी. नवले यांच्या मार्फत</u> –**

६. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा हा मी पोलीस स्टेशनमध्ये बसूनच तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच हे आमचे नेहमीचे पंच आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना पंचनाम्यासाठी हजर राहण्याकरीता नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सर्व साक्षीदार हे फिर्यादीच्या घरातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सर्व साक्षीदार हे आरोपीचे जवळचे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतंत्र साक्षीदार तपासले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी प्रत्यक्ष कधीही गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला

घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे कोल्हार घोटी रोडवरील वर्दळीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या माहितीच्या आधारे, चुकीचा तपास करून आरोपीविरूध्द चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, माझे व फिर्यादीचे चांगले संबंध असल्यामुळे त्याचे सांगण्यावरून फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून खोटा तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.03.17 17:46:52 +0530

दिनांक १७.०३.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले